लोकमत अकोला, मंगळवार,दि.२० ऑगस्ट २०१३

# जैवविविधता अभ्यास मंडळाच्या अध्यक्षपदी नीळकंठ भुसारी



चिखली : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या जैवविविधता अभ्यास मंडळाच्या अध्यक्षपदी स्थानिक श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एन.बी. भुसारी यांची निवड करण्यात आली आहे. जैवविविधता शास्त्रात विविध संशोधनात्मक प्रकल्प प्राचार्य डॉ. भुसारी यांनी राबविले आहेत. तसेच यावर्षी जिल्ह्याच्या जैवविविधता बोर्डाचे अशासकीय सदस्य म्हणूनही बुलडाणा जिल्हाधिकारी यांनी त्यांची निवड केली आहे. त्यांच्या या कामाची दखल घेऊन संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या कुलगुरूंनी सदरची निवड केली आहे.